# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
## दिनांक ०९.०७.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०८/०७/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६० वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,०५,१०५/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०८/०७/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ४८,१२०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत गुटखा विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत दि. ०८/०७/२०२४ रोजी पोस्टे कळमनुरी हद्दीत ताज हॉटेलचे बाजुला सनम पानशॉपमध्ये कळमनुरी पुर्वेस १ किमी बिट नं १ येथे यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करून स्वत:चे अर्थिक फायद्यासाठी लोकांचे जिवीतास हनीकारक व शरीरासाठी विषद्रव्य असलेला शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, जर्दा तंबाखु असा एकुण ६८०५ रू मुद्देमाल अवैध विक्री करीत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा.